पोलीस निरीक्षक नेरूळ पोलीस स्टेशन, नवी मुंबई

N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**
**प्रथम खबर अहवाल**
**(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)**

**1. District (जिल्हा):** नवी मुंबई  **P.S.(ठाणे):** नेरुळ  **Year (वर्ष):** 2021

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0401  **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 29/10/2021 15:56 बजे

**2.**

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

**3. (a) Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** शुक्रवार  **Date From (दिनांक पासून):** 13/08/2021
   **Time Period (कालावधी):** पहर 7  **Date To ( दिनांक पर्यंत):** 13/08/2021
   **Time From (वेळेपासून):** 18:56 बजे
   **Time To (वेळेपर्यंत):** 19:07 बजे

**(b) Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 29/10/2021  **Time (वेळ):** 15:00 बजे

**(c) General Diary Reference (रोजनामचा संदर्भ**

**Entry No. (नोंद क्र.):** 032  **Date & Time (दिनांक आणि वेळ):** 29/10/2021 15:56 बजे

**4. Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

**5. Place of Occurrence (घटनास्थळ):**

**1.(a) Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):** पूर्व, 1 किमी
**Beat No. (बिट क्र.):**

**(b) Address (पत्ता):** नेरूळ हावरे मॉल, समोरील रोडवर,नवी मुंबई

**(c) In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

**6. Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

**(a) Name (नाव):** प्रमोद नथनी मुखीया

**(b) Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

**(c) Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1989  **(d) Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

**(e) UID No. (यु.आय.डी. क्र.):**

**(f) Passport No.(पारपत्र क्र.):**  **Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

**(g) Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)**
**ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| S.No.(अ. | Id Type (ओळखपत्राचा प्रकार) | Id Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

**(h) Address (पत्ता):**

(h) **Address (पत्ता):**

| S.No.(अ. क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | 105, से नं 20, , बेलापूर,नवी मुंबई,नेरुळ,नवी मुंबई,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | 105, से नं 20, , बेलापूर,नवी मुंबई,नेरुळ,नवी मुंबई,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):** **Mobile (मोबाइल नं.):** 91-7039596707

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | श्री. राकेश हिरालाल गेटमे | | | 1. साईदिप निवास,,घोदर्विदे नगर, वाशिंद, ता शहापुर, जिठाणे ,नेरुळ,नवी मुंबई, महाराष्ट्र,भारत |
| 2 | श्री. विजय प्रकाश लावंड | | | 1. 84,जयजवान अपार्टमेन्ट,एल -1, सेक्टर नं 5,ऐरोली, नवी मुंबई,नेरुळ, नवी मुंबई,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. मध्ये)) |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)-(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

11 **Inquest Report / U.D. case No., if any (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ. क्र.) | UIDB Number (यु.आय.डी. बी.क्र.) |
|---|---|

12 **First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्याद अँन्टी करप्शन ब्युरो, नवी मुंबई दिनांक:- 29/10/2021 मी प्रमोद नथनी मुखीया वय 32 वर्षे, धंदा व्यापार रा. शिवशक्ती बिल्डींग, रूम नं. 105, से.नं. 20, बेलापूर, नवी मुंबई (मो. नं. 7039596707) असा असून आज रोजी अँन्टी करप्शन ब्युरो, नवी मुंबई कार्यालयात हजर राहून फिर्याद देतो की, मी वरील ठिकाणी माझे कुंटूबियांसह राहतो. मी व माझा मित्र श्री. सतिश कुमार रा. खारघर नवी मुंबई असे आम्ही दोघे भागिदारीमध्ये सीबीडी, बेलापूर येथे 1) ऑरिन्ज दी एसपीए या नावाने ब्रम्हा कॅम्पलेक्स, प्लट नं. 53, येथे शप नं. बी 109, से.नं. 15 2) नेपटयुन वेल्नेस एसपीए या नावाने थापर कम्प्लेक्स प्लट नं. 51 शप नं. 29,30 से.नं. 15 येथे 3) नका वेल्नेस एसपीए या नावाने एनबीसी कम्पलेक्स, शप नंबर 118ए, से.नं. 11, येथे बडी मसाज पार्लर चालवितो. सदर बडी मसाज पार्लर शपच्या जागा माझे नावाने भाडयाने घेतलेल्या असून सदर जागी बडी मसाज पार्लर चालविण्याबाबतचे महाराष्ट्र दुकाने व आस्थापना नियम 2018 नमुना (ग) नूसार गुमास्ता लायसन मित्र सतिष कुमार यांचे नावे आहे.आमचे वरील बडी मसाज पार्लर मध्ये आम्ही आतल्या जागेचे फर्निचरचा वापर करून वेगवेगळे भाग केलेले असल्याने सीबीडी बेलापूर येथील वर्ड अधिकारी श्री. राकेश गेटमे हे माझे बडी मसाज पार्लर ठिकाणी आले होते. त्यावेळी त्यांनी आमचे बडी मसाज पार्लरचे आतील भागाचे पाहणी करून आम्ही केलेल्या फर्निचर पार्टेशन हे बेकायदेषीर असल्याचे सांगितले. सदर केलेल्या पार्टेषनवर कोणतीही अतिक्रमण कारवाई न करण्यासाठी तीन बडी मसाज पार्लरचे प्रत्येकी रू. 8000/- प्रमाणे एकूण रू. 24000/- पैश्याची मागणी केली. मी वर्ड अधिकारी श्री. राकेष गेटमे यांना रू.24000/- दिले नाहीत तर ते माझे बडी मसाज पार्लरचे आतील भागामध्ये केलेल्या फर्निचरवर अतिक्रमण कारवाई करणार याची मला खात्री झाल्याने त्यांच्या विरूध्द लाचेची कारवाई होणेबाबत मी एसीबी, नवी मुंबई कार्यालयात तत्कालीन पोनि. श्री. नितीन खैरनार, एसीबी, नवी मुंबई यांचे समक्ष दि. 13/08/2021 रोजी हस्तलिखीत तक्रार दिली होती.त्यानंतर सदर तक्रारीच्या अनुशंगाने लाचेची सत्यता पडताळणी करणे करीता पोनि. श्री.नितीन खैरनार, अँन्टी करप्शन ब्युरो, नवी मुंबई यांनी त्यांचे कार्यवाही प्रमाणे उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, वाशी, नवी मुंबई येथे शासकिय पंचाची मागणी केली असता, सदर कार्यालयातील पंच साक्षीदार 1) श्री. अमित दत्तात्रेय पवार वय 43 वर्श, कनिष्ठ लिपिक, उप प्रादेशिक कार्यालय, नवी मुंबई 2) श्रीमती. नेहा जयसिंग दहिवले वय 50 वर्षे, वरिष्ठ लिपिक, उप प्रादेशिक कार्यालय, नवी मुंबई असे ए.सी.बी. नवी मुंबई कार्यालयात हजर झाले. त्यावेळी पोनि. श्री. नितीन खैरनार यांनी सदर पंचाना माझी ओळख करून देवून त्यांची

ओळख मला करून दिली. मी दिलेल्या तक्रारीचे अनुशंगाने दिनांक 13/08/2021 रोजी लाचेच्या तक्रारीची पडताळणी करणेकामी पोनि. श्री. नितीन खैरनार यांनी मला लोकसेवक श्री. राकेश गेटमे हे कोठे भेटतील ? याबाबत विचारणा केली असता मी श्री. राकेश गेटमे यांना फोन केल्यानंतर ते सांगतील त्याठिकाणी त्यांची भेट घ्यावी लागेल असे सांगितले. त्यानुसार पोनि. श्री. नितीन खैरनार यांच्या सुचनेप्रमाणे डिजीटल व्हाईस रेकार्डर सुरू केल्यानंतर मी माझे मोबाईल क्रमाक. 7039596707 वरून श्री. राकेष गेटमे यांचे मोबाईल क्र. 9892994356 वर 17:29 व 17:31 वाजता दोन वेळा फोन केला असता श्री. राकेष गेटमे यांनी सदरचा फोन रिसीव्ह केला नाही. त्यानंतर श्री. राकेश गेटमे यांचे मोबाईलवरून माझे मोबाईल फोनवर 17:56 वाजता फोन आला. त्यावेळी मी त्यांना कोठे भेटायचे ? याबाबत विचारले असता श्री. राकेश गेटमे यांचा फोन कट झाला परत 17:57 वाजता श्री. राकेश गेटमे यांचा माझे मोबाईल फोनवर फोन आला असता श्री. राकेश गेटमे यांनी मला नेरूळ येथिल हावरे मल जवळ भेटण्याबाबत सांगितले. त्यानंतर पोनि. श्री. नितीन खैरनार यांच्या सुचनेप्रमाणे आम्ही नेरूळ येथिल हावरे मल जवळ जात असतांना श्री. राकेष गेटमे यांचा पुन्हा 18:21 वाजता फोन आला त्यावेळी श्री. राकेष गेटमे यांनी काही कामानिमीत्त मी नेरूळला जावून दहा मिनटात हावरे मल येथे येतो असे सांगितले. सदरचे फोनवरील संभाशण डिजीटल व्हाईस रेकर्डर मधिल मेमरी कार्डवर ध्वनिमुद्रित करण्यात आलेले आहे. त्यानंतर पोनि. नितीन खैरनार यांचे सुचनेनुसार माझी गाडी नेरूळ येथिल हावरे मलचे समोरील रस्त्यावर पोहचल्यानंतर रस्त्याच्या कडेला थांबविली. त्यानंतर पोनि. श्री. नितीन खैरनार यांचे सुचनेनुसार पोना. ताम्हाणेकर यांनी डिजीटल व्हाईस रेकर्डर चालु करुन माझे नेसुस शर्टाच्या आतील बाजुस बनियनच्या आतमध्ये डिजीटल व्हाईस रेकर्डरचा माईक अडकवून डिजीटल व्हाईस रेकर्डर माझे बनियानच्या आतमध्ये व्यवस्थित ठेवुन दिला. त्यानंतर श्री. राकेश गेटमे यांना संशय येण्याची शक्यता असल्याने माझे व्यतिरिक्त सर्वजण गाडीचे बाहेर उतरले. त्यावेळी मी माझे गाडीचे ड्रायव्हिंग सिटवर बसलो होतो. त्यावेळी पोनि. खैरनार यांनी पंच क्रं. 1 यांना गाडीचे बाहेर गाडीचे जवळपास थांबण्यास सांगुन मला भेटण्यासाठी येणारे श्री. राकेश गेटमे यांच्याकडे पाहण्याबाबत सांगितले. तसेच श्री. राकेष गेटमे व मी गाडीचे बाहेर बोलत उभे राहिले तर आमच्यामधिल संभाशण लक्षपुर्वक ऐकण्याबाबत सुचना दिल्या. त्यानंतर पडताळणी पथक व पंच क्रं. 2 असे माझे गाडीचे आजूबाजूस काही अंतरावर कोणासही काही संषय येणार नाही अषा पध्दतीने थांबून राहिले. त्यानंतर काही वेळाने माझे गाडीमध्ये लोकसेवक श्री. राकेश गेटमे हे गाडीच्या पाठीमागील सिटवर बसले व त्यांचे सोबत आलेले कर्मचारी श्री. विजय लावंड हे माझे बाजूचे सिटवर बसले. त्यानंतर मी सुरवातीस त्यांचे सोबत माझे बडी मसाज पार्लरचे आतील केलेल्या पार्टीशनवर कोणतीही अतिक्रमण कारवाई न करण्याबाबत लोकसेवक श्री. राकेश गेटमे यांना विनंती केली असता श्री. गेटमे यांचे सोबत आलेले कर्मचारी श्री. विजय लावंड मला म्हणाले की, तुमच्या विरूध्द तक्रारी अर्ज आल्यामुळे आम्ही कारवाई करणार होतो. परंतू अर्जदार गावी गेला असल्याने कारवाई तात्पुरती थांबविली आहे असे मला बोलले. त्यावेळी मी माझे विरूध्द कारवाई न करण्यासाठी विनंती केली असता लोकसेवक श्री. राकेश गेटमे यांनी मला टू फोर करावे लागेल असे बोलले त्यावेळी मी टू फोर म्हणेज काय ? असे विचारले असता श्री. राकेश गेटमे यांनी श्री. विजय लावंड यांना मोबाईल मध्ये दाखव याला. असे मोबाईलवर आकडा दाखविण्याबाबत सांगितले. त्यानुसार श्री. विजय लावंड यांनी मला त्यांचे मोबाईलवर 24000 असा अंक दाखविला त्यावेळी मी त्यांना चोविस हजार जास्त होतात असे बोलून दोन तीन दिवसात पैसे जमा करतो असे बोललो असता लोकसेवक श्री. राकेश गेटमे हे मला ओ आप सोचे क्या करना है असे मला बोलुन ते दोघे गाडीच्या बाहेर उतरून निघून गेले. सदरचे संभाशण डिजीटल व्हाईस रेकर्डरमधील मेमरीकार्ड मध्ये ध्वनिमुद्रीत करण्यात आलेले आहे. मी श्री. राकेश गेटमे व श्री. विजय लावंड यांना दोन ते तीन दिवसांत पैसे जमा झाल्यानंतर देतो असे सांगितल्याने पोनि. नितीन खैरनार यांनी माझेकडे पैसे जमा झाल्यानंतर लोकसेवक यांचे विरूध्द लाचेची सापळा कारवाई करण्यात येणार असल्याचे ठरविण्यात आले होते. सदर बाबत दिनांक 13/08/2021 रोजी सविस्तर पडताळणी पंचनामा करण्यात आलेला आहे. दिनांक 14/10/2021 रोजी मी एसीबी, नवी मुंबई कार्यालयात हजर राहीलो असता मला समजले की, पोनि श्री.नितीन खैरनार यांची एसीबी, नवी मुंबई येथून बदली झाली असून त्यांचा पद्भार पोलीस निरीक्षक श्रीमती. विद्युलता चव्हाण यांनी स्विकारला आहे. त्यावेळी मी, पोनि श्रीमती. विद्युलता चव्हाण यांना सांगितले की, दि. 13/08/2021 रोजीच्या पडताळणीच्या दोन ते तीन दिवसानंतर माझेकडे पैसे जमा झाल्यानंतर लोकसेवक श्री. गेटमे यांना सदर पैसे देण्यासाठी कोठे भेटायचे ? हे विचारण्यासाठी दोन ते तीन वेळा मी त्यांना फोन केला. परंतू लोकसेवक श्री.गेटमे यांनी माझा फोन रिसीव्ह केला नाही. तसेच दिनांक 13/08/2021 रोजीच्या लाचेच्या पडताळणीनंतर लोकसेवक श्री. राकेश गेटमे व श्री. विजय लावंड यांनी सुद्धा मला आजपावेतो लाचेची रक्कमे सबंधाने कोणत्याही प्रकारे संपर्क केलेला नाही. लोकसेवक श्री. राकेश गेटमे हे माझा फोन रिसीव्ह करत नाहीत किंवा मला फोनही करीत नाहीत तसेच त्यांनी माझेकडे लाचेची मागणी करून बराच कालावधी झाला असल्याने त्यांना माझा संशय आला असावा असे मला वाटत आहे. त्यामुळे ते आता माझ्याकडून लाचेची रक्कम स्विकारतील असे वाटत नाही. अषी हकिकत सांगून लोकसेवक श्री. राकेश गेटमे व श्री. विजय लावंड यांनी दिनांक 13/08/2021 रोजी रू. 24,000/ मागणी केलेल्या लाचेच्या रक्कमेच्या अनुशंगाने त्यांच्याविरूध्द कायदेशीर कारवाई होण्याबाबत विनंती केली असता श्रीमती. विद्युलता चव्हाण, पोलीस निरीक्षक, एसीबी, नवी मुंबई यांनी दिनांक 14/10/2021 रोजी माझा पुरवणी जबाब नोंदविला. त्यानंतर लोकसेवक श्री. राकेष हिरालाल गेटमे, माहिती/नोदणीकार लिपिक, सीबीडी बेलापूर विभाग कार्यालय, नवी मुंबई महानगरपालिका (वर्ग 3) व लोकसेवक श्री. विजय प्रकाष लावंड, वय 31 वर्षे, कनिष्ठ अभियंता (कंत्राटी) सीबीडी बेलापूर विभाग कार्यालय, नवी मुंबई महानगरपालिका, (वर्ग 3) यांच्या विरूध्द भ्रष्ठाचार प्रतिबंधक अधिनियम सन 1988 (संशोधन 2018 )चे कलम 7 प्रमाणे गुन्हा दाखल करण्याची परवानगी मा. पोलीस अधीक्षक, एसीबी, ठाणे कार्यालयाकडून प्राप्त झाले असल्याबाबत पोनि. श्री. विद्युलता चव्हाण यांनी मला आज रोजी सांगितले आहे.तरी दिनांक 13/08/2021 रोजी लाचेच्या मागणीच्या सत्यता पडताळणी कारवाई दरम्यान लोकसेवक श्री. राकेश हिरालाल गेटमे, माहिती/नोदणीकार लिपिक, सीबीडी बेलापूर विभाग कार्यालय, नवी मुंबई महानगरपालिका (वर्ग 3) व लोकसेवक श्री. विजय प्रकाष लावंड, वय 31 वर्षे, कनिष्ठ अभियंता (कंत्राटी) सीबीडी बेलापूर विभाग कार्यालय, नवी मुंबई महानगरपालिका, (वर्ग 3) यांनी त्यांना लोकसेवक या नात्याने मिळालेल्या अधिकाराचा व पदाचा दुरुपयोग करुन तक्रारदार यांचे तीन बडी मसाज पार्लरचे आतील भागाचे फर्निचर पार्टेशनवर कोणतीही अतिक्रमण कारवाई न करण्यासाठी तीन बडी मसाज पार्लरचे प्रत्येकी रू. 8000/- प्रमाणे एकूण रू. 24000/- लाचेची मागणी केली आहे. म्हणून लोकसेवक श्री. राकेष हिरालाल गेटमे, माहिती/नोदणीकार लिपिक, सीबीडी बेलापूर विभाग कार्यालय, नवी मुंबई महानगरपालिका (वर्ग 3) व लोकसेवक श्री. विजय प्रकाश लावंड, वय 31 वर्षे, कनिश्ठ अभियंता (कंत्राटी) सीबीडी बेलापूर विभाग कार्यालय, नवी मुंबई महानगरपालिका, (वर्ग 3) यांच्या विरूध्द माझी कायदेशिर फिर्याद आहे. माझा वरील फिर्यादी जबाब माझे समक्ष संगणकावर टंकलिखीत केलेला असून तो मला वाचून समजावून सांगितला तो माझे सांगणेप्रमाणे बरोबर व खरा आहे.

13.Action Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at
(केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.) or (किंवा)

(1) Registered the case and took up the investigation: (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

(2) Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव): ANIL MADHUKAR SHINKAR
Rank (पद): SI (Sub-Inspector)
No.(क्र.): 15101000402AMS to take up the Investigation (ला तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)

(3) Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) Transferred to P.S.(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):
District (जिल्हा):
on point of jurisdiction (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

R.O.A.C.(आर. ओ .ए .सी.)

14. Signature/Thumb impression of the complainant / informant.(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. Date and time of dispatch to the court (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

पोलीस ठाणे अमलदार
नेरुळ पोलीस ठाणे
नवी मुंबई

Signature of Officer in charge, Police Station (ठाणे प्रभारी अधिका-याची

Name (नाव): sham khanderao shinde
Rank(पद): I (Inspector)
No.(सं.): pcmh84207

पोलीस निरीक्षक सत्यमेव जयते नवी मुंबई

**Attachment to item 7 of First Information Report (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र):**

**Physical features, deformities and other details of the suspect/accused: ( If known /**
**(संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्टये, व्यंग आणि इतर तपशील))**

| S.No.(अ.क्र.) | Sex (लिंग) | Date/Year of Birth (जन्म | Build (बांधा) | Height (cms.) (उंची | Complexion (रंग) | Identification Mark(s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |
| 2 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |

| Deformities/ Peculiarities | Teeth (दात) | Hair (केस) | Eyes (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit(s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |
| | | | | | |

| Language /Dialect (भाषा/बोलीभाषा) | Place Of (का स्थान) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
**(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.)**